# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वे दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

## परीक्षा व मुल्यमापन मंडळ विभाग

कॉम्पलेक्स परिसर, एम.आय.डी.सी. रोड,
गडचिरोली - ४४२६०५

दुरध्वनी क्रमांक : कार्यालय : ०७१३२-२२३३२०
ईमल : *coegondwana@gmail.com*

जा. क्र. गों.वि/परीक्षावि./3500/२०२२ — दि. 26/०५/२०२२

## Standard Operating Procedure (SOP) for Conduction of Offline MCQ OMR based Examinations of Summer 2022 (for Students)

१. उन्हाळी २०२२ परीक्षेतील सर्व अभ्यासक्रमाच्या पदवी/पदव्युत्तर वर्गामधे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सदर परीक्षा घेण्यात येईल.

२. सदर परीक्षा Offline OMR MCQ (बहुपर्यायी प्रश्न) पध्दतीने घेतल्या जातील. OMR Sample sheet विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

३. सदर परीक्षा दि. १० जून २०२२ पासुन संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येणार असुन सदर परीक्षा चार शिफ्ट मध्ये असेल. पहिली शिफ्ट सकाळी १०.०० ते ११.१५ वा., दुसरी शिफ्ट १२.०० ते ०१.१५ वा, तिसरी शिफ्ट ०३.०० ते ०४.१५ वा. व चौथी शिफ्ट ०५.०० ते ६.१५ वा. राहिल.

४. विद्यार्थ्यांना सदर प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार एकुण ७५ मिनिट अवधी देण्यात येईल.

५. एकुण ५० बहुपर्यायी प्रश्न असतील व प्रत्येक प्रश्नाला १ गुण याप्रमाणे एकुण ५० गुणाचा पेपर असेल. चुक प्रश्नासाठी कोणतेही Negative Marking नसतील. सदर बहुपर्यायी परीक्षेतील प्राप्त गुण सबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षा योजणेनुसार परीवर्तीत करण्यात येईल.

६. विद्यापीठाने नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर जाऊन प्रवेशपत्रात नमूद दिनांक व वेळे नुसार परीक्षा देणे अनिवार्य राहिल. कोणत्याही कारणास्तव फेरपरीक्षा घेण्यात येणार नाही.

७. सदर परीक्षा विद्यापीठाच्या संबंधीत विषयाच्या १०० टक्के अभ्यासक्रमावर (Syllabus) आधारीत असेल.

८. परीक्षेनंतर विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांना उत्तर सुची (Answer key) पुरविल्या जाणार नाही तसेच OMR संगणकाद्वारे तपासण्यात येणार असल्याने पुनःर्मूल्यांकन केले जाणार नाही.

९. विद्यार्थ्यांना परीक्षा प्रक्रियेसंदर्भात अडचण उद्‌भवल्यास विद्यार्थ्यांने सबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधावे.

१०. दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमानूसार अधिकचा वेळ देण्यात येईल.

शैक्षणिक सत्र २०२१-२२ मधील उन्हाळी २०२२ च्या लेखी Offline MCQ OMR पध्दतीची परीक्षा उपरोक्त मार्गदर्शक सुचनेनुसार घेण्यात येईल याची सर्व मा. प्राचार्य, शैक्षणिक विभागप्रमुख तथा विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

23.5.2022
(डॉ. अनिल चिताडे)
संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली